ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ — पुणें, बुधवार तारीख २० मे, १९५९ — अंक १०

## विविध माहिती

**इथिओपिआंत कापडाची गिरणी**— इथिओपिआच्या राजधानी आदिस-अबाबाजवळ एक कापडाची गिरणी भारतीय तंत्रज्ञांच्या साह्यानें काढण्यांत येणार आहे. गिरणीची मालकी इथिओपिआचें सरकार व बिर्ला बंधू ह्यांची राहील. इथिओपिआंतील ही पहिलीच गिरणी होईल.

**अधिक नोकऱ्यांची जरुरी**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत लोकसंख्येची वाढ अपेक्षेपेक्षा जास्त झाल्यामुळें बेकारी नाहींशी करण्यासाठीं १·५ कोटी नव्या नोकऱ्या उत्पन्न करण्याची जरूरी आहे. तथापि ८० लाख नोकऱ्याच उपलब्ध होण्याची शक्यता असल्यामुळें तिसऱ्या कार्यक्रमाच्या सुरवातीला मागील बेकारांची ७० लाख संख्या राहीलच.

**रशिअन शास्त्रज्ञांची ब्रिटनला भेट**—ब्रिटनच्या हारवेल येथील अणुसंशोधन-केंद्राला भेट देण्यासाठी ६ रशिअन शास्त्रज्ञ गेले आहेत. गेल्या नोव्हेंबरमध्यें कांहीं ब्रिटिश अणुशास्त्रज्ञांनीं रशिआला भेट दिली होती. त्या भेटीला ही प्रतिभेट आहे. सर्व रशिअन शास्त्रज्ञ अणुसंघटनाशास्त्रांतील तज्ज्ञ आहेत.

**बरौनी येथील तेलाचा कारखाना**—बरौनी येथें राशियाच्या सहकार्यानें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्याची प्राथमिक तयारी पूर्ण झाली आहे. कारखाना १९६२ मध्यें चालू होईल असा अंदाज आहे. कारखान्यांत वंगणाचें तेलहि निर्माण करण्यांत येईल.

**भाताच्या लागवडीची चिनी पद्धत**—येत्या खरीप पिकांच्या हंगामांत भारतांत ३१ ठिकाणीं भाताच्या लागवडीची चिनी पद्धत अमलांत आणण्यांत येणार आहे, अशी माहिती लोकसभेंत अन्नमंत्र्यांनीं सांगितली. मुंबई राज्यांत कर्जत व इगतपुरी तालुक्यांत ह्या पद्धतीचा प्रयोग करण्यांत येणार आहे.

**चीनमधील पद्धतींची शिफारस**—जपान व चीन ह्या देशांतील पोलादाच्या उत्पादनपद्धतींचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारचें पांच जणांचें मंडळ त्या देशांत गेलें होतें, तें आतां परत आलें असून त्यानें आपल्या अहवालांत चीनमधील उत्पादनपद्धति भारतानें स्वीकारावी असा अभिप्राय व्यक्त केला आहे. मंडळानें आपल्या सहा आठवड्यांच्या दौऱ्यांत अवघे सहाच दिवस जपानमध्यें निरीक्षण केलें.

**डोळ्यांच्या रोगावर आयुर्वेदीय उपाय** - दिल्ली येथील आयुर्वेद संशोधन संस्थेनें डोळ्यांच्या रोगावर एक उत्कृष्ट गुणकारी औषध शोधून काढल्याचें जाहीर केलें आहे. हें औषध भारतांत सर्वत्र सांपडूं शकणाऱ्या एका वनस्पतीपासून तयार केलें आहे. सामान्यतः असाध्य समजले जाणारे डोळ्याचे रोग त्यानें बरे होतात. सुमारें १०० वैद्यकीय व्यवसायिकांनीं औषधाचा यशस्वी प्रयोग केला आहे.

**सूर्य अधिक तेजस्वी झाला**—अमेरिकेंतील लॉवेल वेधशाळेनें केलेल्या संशोधनावरून असें दिसून आलें आहे कीं १९५३ ते १९५८ ह्या पांच वर्षांच्या कालांत सूर्याचा तेजस्वीपणा २ टक्क्यांनीं वाढला आहे. त्यावरून असा तर्क करण्यांत येत आहे कीं सूर्याच्या उष्णतेंतहि थोडीबहुत वाढ झाली असावी. ह्या शोधामुळें पृथ्वीच्या इतिहासांतील हिमयुगावर अधिक प्रकाश पडण्याचा संभव आहे.

**नेपाळचा नकाशा** – नेपाळच्या भूप्रदेशाचा अधिकृत नकाशा तयार करण्याचें प्राथमिक काम गेले कांहीं महिने भारतामधील तज्ज्ञ करीत आहेत. नेपाळचा बहुतेक भाग डोंगराळ व दुर्गम असल्यानें त्याचा विश्वसनीय असा नकाशा नाहीं. सुमारें ४० वर्षांपूर्वीं राज्याच्या विस्ताराची साधारण रूपरेषा तयार करण्यांत आली होती.

**पश्चिम जर्मनीची पाकिस्तानला मदत**—पश्चिम जर्मन सरकारनें पाकिस्तानला १७ कोटी मार्कसचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. कर्जाचा उपयोग पाकिस्तानमधील शेतीच्या सुधारणेसाठी करावयाचा आहे. त्याशिवाय निर्वासितांची सोय करण्यासाठी मध्यम प्रतीचे व छोटे उद्योगधंदे काढण्यांत येणार आहेत. ह्या कार्यक्रमांसाठींहि कर्जाचा उपयोग करण्यांत येईल.

**सुरत येथें औषधाचा कारखाना**—सुरत येथें औषधासाठीं लागणाऱ्या मूलभूत रसायनांचा एक कारखाना काढण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. कारखान्यासाठी ३ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. कारखान्यासाठी बलसाड तालुक्यांत १,२०० एकर जागा निवडण्यांत आली आहे.

**उत्तर प्रदेशांत साखरेची टंचाई**—उत्तर प्रदेशांत साखरेची टंचाई निर्माण झाल्यानें किरकोळ दुकानदारांनीं साखरेच्या किंमती २५ टक्क्यांनीं वाढविल्या आहेत. त्याचप्रमाणें चहाच्या छोट्या दुकानदारांनीं एक कप चहाचा दर १२ नये पैशांऐवजीं १५ नये पैसे केला आहे. उत्तर प्रदेशांत दरसाल सुमारें १० लाख टन साखर तयार होते.

**स्ट्रॉन्शिअम ९० चा विखार**—अणुबॉबच्या स्फोटामुळें वातावरणांत स्ट्रॉन्शिअम ९० हें विषारी द्रव्य पसरतें व दीर्घकाळ टिकून रहातें. ह्या विषारी द्रव्याचें परिमाण निश्चित करण्यासाठी ब्रिटननें सहा शास्त्रीय केंद्रें उभारलीं आहेत. हें द्रव्य माणसाच्या हाडांत घर करतें व त्यामुळें कॅन्सर रोग होतो.

### साखरेचा खप वाढला, उत्पादन घटलें

साखरेच्या किंमती सर्वत्र वाढल्या आहेत. १९५८-५९ च्या मोसमांतील साखरेचें उत्पादन १९ लक्ष टनपेक्षा अधिक भरण्याचा संभव दिसत नाहीं; १९५७-५८ मध्यें १९.७८ लक्ष टन साखरेचें उत्पादन झालें होतें. साखर कारखाने व त्यांची उत्पादनक्षमता वाढत असूनहि उत्पादन घटलें आहे. खांडसारी साखरेकडे उसाचा पुरवठा अधिकाधिक वळत आहे, त्यामुळें साखर कारखान्यांकडे पुरेसा ऊंस गाळणीसाठी येत नाहीं. कारखान्यांत तयार होणाऱ्या साखरेप्रमाणें खांडसारी साखर व गूळ ह्यांचेहि भाव वाढले आहेत. साखरेचा खपहि झपाट्यानें वाढत आहे. निर्गतीचें एक लक्ष टनांचें लक्ष्य गांठलें गेलें, तर पुरवठ्याची परिस्थिति अधिकच बिकट होईल. अद्याप निर्गतीचें मान थोडेंच आहे, मार्च, १९५९ अखेर शिलकी साखर ११.६८ लक्ष टन होती; मार्च, १९५८ अखेर ती १३.३४ लक्ष टन होती. ह्याचा अर्थ, १९५९-६० चा मोसम सुरू होईल. तेव्हां साखरेचा सांठा दोन लक्ष टनांनीं कमी झालेला असेल. शिलकी साखर जास्त प्रमाणांत बाजारांत येऊं दिली गेली, तर साखरेची किंमत उतरूं शकेल. पण, १९५९-६० मध्यें साखरेचें उत्पादन खूपच सुधारलें नाहीं, तर साखरेची निर्गत करतां येणार नाहीं, इतकेंच नव्हे तर ती आयात करण्याची पाळी येईल. साखरेच्या आयातीवर परराष्ट्रीय हुंडणावळ खर्चण्यासारखी आजची आपली परिस्थिति नाहीं. तेव्हां, साखर कारखान्यांचें उत्पादन वाढणें आणि त्यासाठी त्यांना उसाचा भरपूर पुरवठा होणें अगत्याचें ठरतें.

---

### को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा : मार्च १९५९ चा रिझल्ट

**महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें-१**

**पहिला वर्ग :**—डी. बी. महाशब्दे, एस्. व्ही. आरळी, एस. बी. गोखले, एम्. आर. लेले.

**दुसरा वर्ग :**—ए. जी. इंगळे, डी. ई. जेवरे, सौ. गुणशीला करंदीकर, डी. व्ही. कुलकर्णी, एम्. व्ही. मोरे, व्ही. बी. पटवर्धन, बी. एल. आपटे, जी. बी. चितळे, एस. आर. महाजन, डी. डी. सोनावणे, ए. एस. भोसले, वाय. बी. गव्हाणे, के. एस. जोशी, व्ही. के. कुलकर्णी, ए. एस. मगदूम, एच. एस. मानेपाटील, सी. पी. मोकाशी, जे. डी. पाटील, बी. डी. पवार, पी. डी. शिंदे, व्ही. ए. थोरात, जी. बी. आळशी, कु. मंदा सिरे, जे. एस. कोले, सौ. विमल उचगांवकर.

**तिसरा वर्ग :**—एस. आर. अंधेरे, एम्. एस. गायकवाड, एस. एस. गौराजे, डी. आर. हिंदुराव, एस. टी. कुंभार, एस. बी. पडळकर, एस. एन्. पावसकर, एस. टी. प्रभुदेसाई, एस. व्ही. सहस्रबुद्धे, व्ही. डी. आरोळे, एन्. आर. दिवे, कु. सुमन लाटकर, व्ही. जे. निंबाळकर, एस. जी. पाटील, व्ही. जे. सुमंत, पी. जी. कुलकर्णी, व्ही. डी. शिंदे.

### व्यापारी क्षेत्रांत चीनचें चढाईचें धोरण

गेल्या कांहीं वर्षांत चीननें व्यापाराच्या क्षेत्रांत चढाईचें धोरण स्वीकारलेलें दिसून येत आहे. ह्या धोरणाचा धक्का इतर देशांप्रमाणें भारत व जपान ह्यांनाहि बसत आहे. आग्नेय आशिआंतील देशांतील कापडाच्या बाजारपेठेंत चीनच्या कापडाची भारताच्या कापडाला स्पर्धा होऊं लागली आहे. मध्यपूर्वेतील व आफ्रिकेंतील बाजारपेठांतूनहि चीनचा माल आपलें बस्तान बसवूं पहात आहे. निर्यात व्यापाराच्या ह्या स्पर्धेत जपानला धक्का बसत आहे. संयुक्त-अरब-प्रजासत्ताक राज्यांत सामील असलेल्या देशांत १९५४ सालीं चीननें सुमारें १,२०,००,००० डॉलर्स किंमतीचा माल निर्यात केला होता. १९५७ सालीं चीनच्या निर्यात मालाची किंमत ५,४७,००,००० डॉलर्स इतकी वाढल्याचें दिसून आलें आणि १९५८ सालीं ही किंमत आणखी बरीच वर गेली आहे १९५४ सालीं चीनचा माल. इजिप्त, मोरोक्को, सीरिआ व दक्षिण आफ्रिका ह्या देशांना पाठविण्यांत येत असे. आतां मध्यपूर्वेतील सर्व देश व आफ्रिका ह्या भागांत चिनी मालाचा प्रवेश झाला आहे. १९५७ सालीं चीननें बिगर-कम्युनिस्ट देशांना जितका माल निर्यात केला त्याच्यापैकीं ८ टक्के माल ह्या देशांना निर्यात केला. ह्या भागांतील आपला व्यापार वाढविण्यासाठी चीन अनेक मार्गांचा अवलंब करीत आहे. उभयविध करार, व्यापारी प्रदर्शनांत भाग घेणें, संबंधित देशांकडून मिळणारा माल मुद्दाम आयात करणें, आपल्या मालाच्या किंमती कमी ठेवणें, संबंधित देशांना आर्थिक साह्य करणें, आपल्या मालाचे पैसे हप्त्यानें घेणें, इत्यादि अनेक मार्ग चीन अनुसरत आहे. ह्या व्यापारी चढाईचें स्वरूप इतकें मोठें आहे कीं त्यामागें पाश्चात्य देशांविरुद्ध राजकीय वातावरण निर्माण करण्याचा हेतु असण्याचाहि दाट संभव आहे असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

---

**लोकसंख्येच्या वाढीचा गंभीर प्रश्न**—जागतिक आरोग्य संघटनेच्या १२ व्या अधिवेशनांत बोलतांना भारताचे आरोग्यमंत्रि श्री. बी. पी. करमरकर म्हणाले कीं, भारतामधील लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न अतिशय गंभीर होत आहे. आरोग्य राखण्याच्या बाबतींत सुधारणा झाली असल्यामुळें लोकसंख्येच्या वाढीचा वेग अधिकच झाला आहे.

**सहकारी साखर कारखान्याची मागणी**—कोपरगांव तालुक्यांतील टाकळी गांवच्या शेतकऱ्यांनीं मुंबई सरकारकडे सहकारी साखर कारखाना उभारण्याची परवानगी मागितली आहे. ह्या भागांत ४,६०० एकर जमिनींत उसाचें पीक काढण्यांत येतें. कारखान्यासाठी लागणाऱ्या भांडवलापैकीं १८ लाख रु. शेतकऱ्यांनीं जमा केले आहेत.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

# अर्थ

बुधवार, ता. २० मे, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सरकारच्या कर्जउभारणीविषयीं अंदाज

### अंदाजपत्रकांतील अपेक्षा पुरी होईल काय ?

१९५९–६० मध्यें मध्यवर्ती आणि राज्य सरकारें कर्ज-उभारणीचा आपला कार्यक्रम कसा आंखतील व पार पाडतील, ह्याविषयीं आतां तर्क चालू झाले आहेत. ह्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत मध्यवर्ती सरकार १०८ कोटी रुपयांची कर्जउभारणी करील असा अंदाज धरलेला आहे. राज्य सरकारें सुमारें ६० कोटी रुपये कर्जाची अपेक्षा बाळगून आहेत. म्हणजे, सुमारें १७० कोटी रु. नव्या कर्जापोटीं जमा व्हायला हवेत.

गेल्या वर्षीं मध्यवर्ती सरकार मूळ कल्पनेपेक्षा जास्त कर्ज उभारूं शकलें; त्यानें १८१ कोटी रु. व राज्य सरकारांनीं ५८ कोटी रु. बाजारांतून गोळा केले. चालू वर्षीं, एवढें कर्ज सरकारला देण्याची बाजाराची आणि जनतेची परिस्थिति आहे, असें वाटत नाहीं. बँकांनीं दिलेलीं कर्जें त्यांच्याकडे अद्याप परत येऊं लागलेलीं नाहींत; बँका सरकारी कर्जांत किती रकमा गुंतवूं शकतील हें त्यांच्या येणें-कर्जांत होणाऱ्या घटीवर आणि त्यांचे जवळील शिलका वाढण्यावर अवलंबून राहील हें उघड आहे. मध्यवर्ती सरकारच्या कर्जापेक्षा राज्य सरकारांचीं कर्जें बँकांना अधिक पसंत पडतात, हेंहि विसरून चालणार नाहीं.

बँकांतहि स्टेट बँकेचें धोरण व परिस्थिति ह्यास विशेष महत्त्व आहे. १९५७–५८ आणि १९५८–५९ ह्या दोन्हीं वर्षीं बँकांनीं सरकारी रोख्यांत भरपूर रकमा गुंतविल्या. पहिल्या वर्षीं ९३ कोटी रुपयांचे कर्जरोखे त्यांनीं घेतले, त्यांत स्टेट बँकेचा हिस्सा ८६ कोटी रुपयांचा होता. दुसऱ्या वर्षीं त्यांनीं १७३ कोटी रुपयांचे कर्जरोखे घेतले त्यांपैकीं एकट्या स्टेट बँकेनें ९४ कोटी रुपयांचे घेतले. स्टेट बँकेजवळील ठेवींत आणि त्यामुळें त्या बँकेच्या सरकारी रोख्यांतील गुंतवणुकींत यु. स्टे. पी. एल. ४८० अन्नधान्य कर्जाचे कौंटरपार्टरूपी फंड ह्यांचाच मोठा भरणा होता. चालू वर्षीं त्याची पुनरावृत्ति होण्याची शक्यता कमी आहे.

देशांतील उद्योगधंदे वाढत आहेत आणि त्याबरोबर त्यांना होणारा बँक-कर्ज-पुरवठाहि वाढत आहे. हीं कर्जें प्रारंभीं अल्प मुदतीचीं म्हणून दिलीं गेलीं, तरी त्यांची मुदत पुनः पुनः वाढवून दिली जाते आणि तीं कर्जें दीर्घ मुदतीचीं, निदान मध्यम मुदतीचीं तरी बनतात. शेतमालाच्या तारणावरील कर्जें मोसमी असतात, पण औद्योगिक कर्जें वर्षभर कायम रहातात. त्यामुळें, पैशाच्या बाजारांतील पूर्वींच्या हंगामांना आतां तितकासा अर्थ राहिलेला नाहीं. स्टेट बँकेनें दिलेल्या एकूण कर्जापैकीं ६०% कर्जें उद्योगधंद्यांना दिलेलीं आहेत. पोलादाचे आणि सिमेंटचे कारखाने व कापडाच्या गिरण्या हीं त्या बँकेची प्रमुख देणेकरी असतात आणि त्यांची गरज वर्षभराची असते; तिला मोसम नसतात. स्टेट बँकेकडे अमेरिकन अन्नधान्याच्या विक्रीचे कौंटरपार्ट फंड ठेवलेले आहेत, त्यांची रक्कम २०० कोटी रुपयांहून जास्त आहे. ती वगळली, तर ठेवी आकर्षण्यांत स्टेट बँक विशेष यशस्वी झालेली नाहीं. सरकारी कर्जरोख्यांचें दुसरें मोठें गिऱ्हाइक म्हणजे लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन. ह्यानें गेल्या वर्षीं सरकारी रोख्यांत १२ कोटी रु. गुंतविले; चालू वर्षीची गुंतवणूकहि सुमारें तेवढीच होईल. औद्योगिक शेअर्सवर मिळणाऱ्या जास्त व्याजाच्या आकर्षणामुळें त्यामधील जनतेची गुंतवणूक वाढत आहे. अशा रीतीनें सरकारी रोख्यांत गुंतवण्या-जोगया पैशाची उपलब्धता मर्यादित आहे.

## बँक नोकरांना बोनस १९५६ पूर्वींच्या कायद्याला संमत नाहीं

### सुप्रीम कोर्टाचा निवाडा

सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि इतर सहा बँका ह्यांनीं केलेलीं अपिलें सुप्रीम कोर्टानें मंजूर केलीं आहेत. त्याचा परिणाम म्हणजे, बँकिंग कंपन्यांचा कायदा १९५६ मध्यें दुरुस्त करण्यांत आला, त्यापूर्वीचें त्यांतील १० वें कलम बँक नोकरांना बोनस देण्यास प्रतिबंध करतें असें ठरविण्यांत आलें आहे. १० वें कलम असें होतें :—"कंपनीच्या नफ्यांत हिस्सा देणारें वेतन किंवा वेतनाचा कांहीं भाग ज्यास मिळेल, अशा कोणाचीहि बँक नेमणूक करूं शकणार नाहीं." बोनस हा नोकराचा नफ्यांतील हिस्सा असल्याकारणानें, असा बोनस देणें १० व्या कलमाच्या विरुद्ध आहे.

इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टांतील तरतुदी, बँकिंग कंपन्यां-पुरता विचार करतां, १० व्या कलमानें बाजूस सारल्या आहेत आणि नोकरांना बोनस देण्यास बँकांना बंदी करण्यांत आली आहे, असें बँकांतर्फे सांगण्यांत आलें. नोकरवर्गाचें म्हणणें असें होतें, कीं इंडस्ट्रिअल कोर्टानें देवविलेल्या बोनसला हें १० वें कलम बाध आणूं शकत नाहीं. न्यायमूर्ति दास ह्यांनीं सांगितलें, कीं 'रेम्युनरेशन' हा शब्द बँकिंग कायद्यांत व्यापक अर्थानें वापरण्यांत आला आहे; आणि त्यांत बोनसचा खासच समावेश होतो. बँक नोकरांनाच फक्त बोनस मिळूं नये असें विधिमंडळानें कां ठरविलें, हा प्रश्न धोरणाचा असून सुप्रीम कोर्ट त्याचें उत्तर देऊं शकणार नाहीं.

[ बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत दुरुस्ती करणाऱ्या १९५६ च्या कायद्यानें १० व्या कलमांत सुधारणा करून असें ठरविलें कीं, बँकेंत नेमलेल्या कोणाचेंहि वेतन नफ्याचा कांहीं भाग घेणारें असतां कामा नये; मात्र औद्योगिक तंट्यांसंबंधीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याखालीं बँकेनें तडजोड केली किंवा अशा कायद्याखालीं अवार्ड देण्यांत आलें तर मात्र १० वें कलम तेवढ्यापुरतें लागूं होणार नाहीं. ]

---

**तिसऱ्या उपग्रहाचें भ्रमण**—रशिआनें अंतराळांत सोडलेल्या तिसऱ्या उपग्रहानें पृथ्वीभोंवतालची ५,००० वी प्रदक्षिणा पुरी केली आहे. हा उपग्रह गेल्या मे महिन्यांत अंतरिक्षांत सोडण्यांत आला. तेव्हांपासून त्यानें पृथ्वीपासून चंद्र व तेथून परतीच्या अंतराच्या ३०० पट अंतर आपल्या भ्रमणमार्गांत काटलें आहे.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK

## BALANCE SHEET AS

| 31-12-1957 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | 31-12-1958 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital:* | | |
| 43,560 | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—00 | |
| 15,00,250 | 30005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 15,00,250—00 | 15,43,810—00 |
| 15,43,810 | *Issued and Subscribed Capital:* | | |
| 43,560 | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—00 | |
| 7,50,250 | 15005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 7,50,250—00 | 7,93,810—00 |
| 7,93,810 | *Called and Paid-up Capital:* | | |
| 27,225 | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares @ Rs. 25/- each ... | 27,225—00 | |
| 3,75,250 | 15005 Ordinary Shares @ Rs. 25/- each (out of which 5 shares are fully paid) ... | 3,75,250—00 | |
| 4,02,475 | | 4,02,475—00 | |
| 2,280 | *Less*: calls unpaid ... | 2,280—00 | |
| 4,00,195 | | 4,00,195—00 | |
| Nil | *Add*: Forfeited Snares ... | Nil | 4,00,195—00 |
| 290 | Calls in Advance ... | | 290—00 |
| 1,17,000 | **2. Reserve Fund and Other Reserves** | | 1,25,000—00 |
| | **3. Deposits and Other Accounts:** | | |
| 26,48,580 | Fixed Deposits and Recurring Deposits ... | 30,18,125—76 | |
| 25,24,202 | Savings Bank Deposits ... | 26,15,671—51 | |
| 11,54,996 | Current Accounts, Contingency Accounts etc. ... | 14,42,922—55 | 70,76,719—82 |
| 63,27,778 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| Nil | (i) In India ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | Nil |
| | **Particulars** | | |
| | (i) Secured (against Pledge of G. P. Notes) Nil | — | |
| | (ii) Unsecured Nil | — | |
| 30,697 | **5. Bills Payable** ... | | 20,456—20 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra:** | | |
| 1,75,744 | (i) Payable in India ... | 2,24,119—12 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 2,24,119—12 |
| 61,062 | **7. Other Liabilities** | | 65,905—18 |
| Nil | **8. Acceptances, Endorsements and other obligations per Contra:** | | Nil |
| | **9. Profit and Loss Account** | | |
| 21,083 | Profit as per last Balance-Sheet ... | 25,114—03 | |
| | *Less*: appropriations | | |
| | Reserve Fund 6,000-00 | | |
| | Investment Depreciation Fund 2,000-00 | | |
| | Dividend @ 6% on 6% C. R. P. Shares 1,225-00 | | |
| | Income tax paid 12,625-36 | 21,850—36 | |
| | Profit brought from the Profit and Loss Account ... | 3,263—67 | |
| 28,114 | Add Profit for the year (subject to Income-tax for two years) ... | 28,596—87 | 31,860—54 |
| 71,37,822 | Carried over Rs. ... | | 79,44,545—86 |

# LIMITED, POONA CITY.

## AT 31st DECEMBER, 1958

| 31-12-1957 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | 31-12-1958 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 6,85,099 | In hand and with Reserve Bank and State Bank (Including foreign currency notes) ... | | 7,22,590—64 |
| | **2. Balances with Other Banks** (In current accounts) | | |
| 2,32,113 | (i) In India ... | 4,70,130—26 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | 4,70,130—26 |
| 5,00,000 | **3. Money at Call and Short Notice** ... | | 6,00,000—00 |
| | **4. Investments (at cost)** ... | | |
| | Govt. Securities of the face value of Rs. 25,29,300/- | | |
| 23,85,196 | (i) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities, including Treasury Bills of the Central and State Governments. ... | 24,95,896—50 | |
| | (ii) Shares-Ordinary (at cost) | | |
| 27,073 | (i) Fully Paid (Market value Rs. 1,00,886-25) | 99,718—00 | |
| 1,500 | (ii) Partly Paid Nil | Nil | |
| Nil | (iii) Debentures or Bonds ( " 56,000-00) | 54,752—50 | |
| Nil | (iv) Other investments ... | Nil | |
| Nil | (v) Gold ... | Nil | 26,50,367—00 |
| 24,13,769 | | | |
| | **5. Advances** (Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the auditors) | | |
| | (1) Loans, Cash-Credits, Over-drafts etc. | | |
| 23,47,532 | (i) In India ... Rs. 24,35,361-08 | | |
| | (ii) Outside India ... Rs. Nil | 24,35,361—08 | |
| | (2) Bills Discounted and Purchased (excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| 2,12,468 | (i) Payable in India... ... Rs. 2,57,133-29 | | |
| Nil | (ii) Payable outside India... Rs. Nil | 2,57,133—29 | 26,92,494—37 |
| 25,60,000 | | | |
| | **Particulars of Advances** | | |
| 16,06,765 | (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 16,73,085—37 | |
| 3,40,709 | (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security. ... | 3,61,897—53 | |
| 4,84,284 | (iii) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors ... | 4,93,051—47 | |
| 1,28,242 | (iv) Debts considered doubtful or bad, not provided for | 1,64,460—00 | |
| 25,60,000 | | 26,92,494—37 | |
| 47,006 | (v) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 43,748—75 | |
| Nil | (vi) Debts due by Companies or firms in which the Directors of the Banking company are interested as directors, partners or managing agents, or in the case of private companies, as members. ... | Nil | |
| 56,661 | (vii) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to directors or managers or officers of the Banking company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 89,510—99 | |
| Nil | (viii) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking company are interested as directors, partners, or managing Agents or in the case of private companies, as Members ... | Nil | |
| Nil | (ix) Due from Banking Companies ... | Nil | |
| | Carried over ... | | 71,35,582—27 |

# THE BHARAT INDUSTRIAL BANK

## BALANCE SHEET AS

| 31-12-1957 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | 31-12-1958 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought forward ... | | 79,44,545—86 |
| | 10. Contingent Liabilities | | |
| | In respect of partly paid shares held by the Bank on behalf of constituents Rs. 2,250—00 ... | | |
| 71,37,882 | Grand Total Rs. ... | | 79,44,545—86 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st DECEMBER, 1958.

| 31-12-1957 | EXPENDITURE | Rs. nP. | 31-12-1958 Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1,63,086 | 1. Interest paid on deposits, borrowings, etc. ... | | 1,86,007—73 |
| 1,07,873 | 2. Salaries and Allowances and Provident Fund : (including amount paid to Managing Directors Rs. 14,767—44) ... | | 1,07,055—22 |
| 1,140 | 3. Directors' and Local Committee Members' fees and allowances ... | | 840—00 |
| 14,273 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 13,472—82 |
| 98 | 5. Law Charges. ... | | 550—00 |
| 6,027 | 6. Postage, Telegrams and Stamps ... | | 6,552—81 |
| 700 | 7. Auditors' Fees ... | | 700—00 |
| 7,447 | 8. Depreciation on and Repairs to the Banking Company's Property. ... | | 7,302—90 |
| 8,212 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 5,992—72 |
| 905 | 10. Loss from sale of or dealing with non-banking assets. | | 423—65 |
| Nil | 11. Loss on sale of investments in Govt. Securities ... | | Nil |
| 6,695 | 12. Other expenditure. ... | | 5,673—48 |
| 22,467 | 13. Balance of Profit (subject to Inccome-tax for 2 years) | | 28,596—87 |
| 3,38,923 | Total Rs. ... | | 3,63,168—20 |

| 31-12-1957 | INCOME (Less provisions made during the year for Bad and Doubtful debts and other usual or necessary provisions). | Rs. nP. | 31-12-1958 Rs. nP. |
|---|---|---|---|
| 3,01,381 | 1. Interest and Discount. ... | | 3,24,379—77 |
| 14,704 | 2. Commission, Exchange, Brokerage. ... | | 15,822—11 |
| 11,025 | 3. Rents ... | | 11,467—75 |
| Nil | 4. Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to Reserve or any particular Fund or account). ... | | Nil |
| Nil | 5. Net Profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular Fund or Account) ... | | Nil |
| 3,734 | 6. Income from non-banking assets and profit from sale of or dealing with such assets ... | | 2,116—34 |
| 8,079 | 7. Other receipts. ... | | 9,382—23 |
| 3,38,923 | Total Rs. ... | | 3,63,168—20 |

### AUDITOR'S REPORT.

We have audited the attached Balance Sheet of the Bharat Industrial Bank Limited, as of 31st December, 1958, and the Profit and Loss Account annexed thereto, for the year ended on that date in which are incorporated the unaudited returns of the six Branches not visited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227 (5) of Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are therefore drawn up in conformity with forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that: (a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory ;

(b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank ;

(c) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches of the Bank ;

# LIMITED, POONA CITY.

**AT 31st DECEMBER, 1958**

| 31-12-1957 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | 31-12-1958 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 71,35,582—27 |
| | **6. Bills Receivable, being Bills for Collection** as per contra. | | |
| 1,75,744 | (i) Payable in India ... | 2,24,119—12 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 2,24,119—12 |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations as per Contra :** ... | | Nil |
| | **8. Premises ( at cost )** | | |
| 3,76,259 | As per last Balance Sheet ... | 3,76,823—17 | |
| 564 | Additions during the year ... | Nil | |
| 3,76,823 | | 3,76 823—17 | |
| 28,237 | Less Depreciation upto 31-12-1958 ... | 31,895—00 | 3,44,928—17 |
| 3,48,586 | | | |
| | **9. Furniture, and Fixtures ( at Book value )** | | |
| 62,082 | As per last Balance Sheet ... | 62,396—30 | |
| 427 | Additions during the year ... | 939—50 | |
| 62,509 | | 63,335—80 | |
| 113 | Less sales during the year ... | 25—00 | |
| 62,396 | | 63,310—80 | |
| 16,522 | Less Depreciation upto 31-12-1958 ... | 19,329—59 | 43,981—21 |
| 45,874 | | | |
| | **Safe Deposit Vault Equipment ( at cost )** | | |
| 37,080 | As per last Balance Sheet ... | 37,080—12 | |
| Nil | Additions during the year ... | Nil | |
| 37,080 | | 37,080—12 | |
| 3,576 | Less depreciation upto 31-12-1958 ... | 4,413—72 | 32,666—40 |
| 33,504 | | | |
| | **10. Other Assets including Silver** | | |
| 6,084 | Sundry Assets ... | 6,711—38 | |
| 21,525 | Interest accrued on Govt. Securities ... | 27,487—73 | |
| 39,979 | Income-Tax deducted at source ... | 44,241—48 | |
| 24,981 | Stock of Printing ( at cost ) ... | 24,612—25 | |
| 592 | Library ( at cost ) ... | 606—85 | |
| 190 | Stamps in stock ... | 642—94 | |
| Nil | Branch adjustments ... | 8,490—54 | |
| 17,461 | Due from Bank in liquidation ( not provided for ) ... | 17,460—56 | |
| 1,484 | Pre-paid expenses ... | 2,118—21 | 1,32,371—94 |
| 1,12,296 | | | |
| 30,897 | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims ( Market Value )** ... | | 30,896—75 |
| 71,37,882 | Grand Total s. | | 79,44,545—86 |

(d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns ;

(e) Subject to the remark that the liability for taxation for the years 1957 and 1958 amounts to Rs. 27000/-, in our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts ( together with the Directors' Report annexed thereto) give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for Banking Companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of the affairs of the Bank as at 31st December, 1958, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

Poona, Date 27th February, 1959.

**KHARE & Co,**
Chartered Accountants.

**M. K. Kulkarni**
Accountant.

**N. N. Kshirsagar,**
**R. B. Salvekar,**
*Managing Directors*

**K. P. Joshi,** *Chairman.*
**K. M. Mahajan,** *Vice-Chairman.*
**B. B. Walvekar,**
**Mrs. Indumatibai R. Phadake,**
**R. P. Damodare,**
**R. B. Girme,**
} *Directors*

# The Bharat Industrial Bank Limited, Poona City.

***21st Report of the Directors***

(1) The Directors beg to submit to the share-holders the Balance Sheet as on 31st December, 1958 and the Profit and Loss Account for the year ended on that date.

(2) It will be seen that the transactions of the Bank during the year under report resulted in a net profit of Rs. 28,596-87. Adding thereto Rs. 3,263-67 the residue of balance brought forward from the previous year the amount available for distribution is Rs. 31,860-54 which your Directors recommend be appropriated as under:—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| To Reserve Fund (As required by Sec. 17 of the Banking Companies Act 1949) | ... | Rs. | 7,000 | 00 |
| „ Investment Depreciation Fund | ... | Rs. | 5,000 | 00 |
| „ Contingency Fund ... | ... | Rs. | 1,000 | 00 |
| „ Dividend @ 6% C. R. P. Shares | ... | Rs. | 1,225 | 00 |
| „ Balance to be carried forward (Subject to taxation) | ... | Rs. | 17,635 | 54 |
| | ... | Rs. | 31,860 | 54 |

(3) The business of the Bank during the year under report was satisfactory. Deposits have shown an increase of more than Rupees Seven lacs. The Branches of the Bank are also working satisfactorily. The Board is conscious that the profit of the Bank needs improvement and with this end in view necessary, measures are being adopted.

(4) Under Article 113 of the Articles of Association of the Bank three of the Directors viz. (1) Shri K. M. Mahajan, (2) Shri R. P. Damodare and (3) Mrs. Indumatibai R. Phadke, retire by rotation, they are eligible for re-election and offer themselves for the same. You are requested to appoint Auditors and fix-up their remuneration.

(5) The Directors place on record their deep sense of gratitude and thankfully acknowledge the valuable assistance rendered by the member of the Local Advisory Boards of Branches. They are as well glad to appreciate the services rendered by the Managing Directors and the staff working under them.

Poona, Date 27-2-1959.

On behalf of the Board,
K. P. JOSHI,
*Chairman.*

**होमिओपाथीला मान्यता**—मद्रास सरकारनें होमिओपॅथिक औषधपद्धतीला मान्यता देण्याचें ठरविलें आहे. ह्यासंबंधीं जरूर असणारा कायदा लवकरच विधिमंडळांत प्रविष्ट करण्यांत येणार आहे. ह्या पद्धतीनें औषधोपचार करणाऱ्या डॉक्टरांना कांहीं किमान अभ्यासक्रम पुरा करावा लागणार आहे. त्याचप्रमाणें व्यवसायावर कांहीं निर्बंधहि घालण्यांत येतील.

**झेक शिक्षकांची आयात**—झेकोस्लोव्हाकिआ आणि इराक ह्यांच्या दरम्यान एक सांस्कृतिक करार करण्यांत आला आहे. करारप्रमाणें, इराकमधील शाळांतून काम करण्यासाठी झेकोस्लोव्हाकिआंतून ४०० शिक्षक इराकमध्यें येणार आहेत. संयुक्त अरब प्रजासत्ताकाच्या ४०० शिक्षकांनीं राजीनामा दिला असून त्यांच्या जागीं वरील शिक्षक काम करतील.

**चंदीगडसाठीं दुधाचा पुरवठा**—पंजाबची राजधानी चंदीगडसाठीं दुधाचा पुरवठा करण्याची एक योजना सरकारतर्फें आंखण्यांत आली आहे. राजधानीच्या भोंवतालीं असलेल्या २० मैलांच्या परिसरांतून दूध गोळा करण्यांत येईल व ते निर्जंतुक करून बाटल्यांतून पुरविण्यांत येईल. दररोज सुमारें १५० मण दूध पुरविण्यांत येईल, असा अंदाज आहे.

**हिंदी रेल्वेची पाहणी**—भारतामधील रेल्वेमार्गांची पाहणी करण्यासाठी जागतिक बँकेच्या दोन सभासदांचें एक मंडळ आलें आहे. मंडळ भारतीय रेल्वेवर, ४,५०० मैल प्रवास करून १५ दिवसांच्या अवधींत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आलेल्या प्रगतीचा अभ्यास करील. मंडळ चित्तरंजन येथील कारखान्याला भेट देईल.

**ब्रिटिश संशोधकाचा सन्मान**—जगांतील पहिलें अणुचलित घड्याळ तयार करणारे ब्रिटिश संशोधक डॉ. लुइ एसेन ह्यांना रशिआनें सन्मानपदक दिलें आहे. डॉ. एसेन ह्यांनीं १९५८ सालीं असा अंदाज केला आहे कीं, पृथ्वीचें आपल्या आसाभोंवतालचें फिरणें मंद होत आहे, आणि सुमारें १ खर्व वर्षांनंतर पृथ्वीची ही गति पूर्णपणें थांबेल.

**समाजवादाचे तीन प्रकार**—श्री. जयप्रकाश नारायण ह्यांनीं समाजवादाचे तीन प्रकार सांगितले आहेत. तामसी समाजवाद हा लोकांवर सक्तीनें लादलेला असतो, राजस समाजवाद हा मध्यममार्गाचा व कायद्यानें स्थापन केलेला असतो, आणि सात्त्विक समाजवाद हा लोकांनीं स्वेच्छेनें स्वीकारलेला असतो असें वर्गीकरण त्यांनीं केलें आहे.

**अधिक मीठ खाणें चांगलें नाहीं**—उन्हाळ्यांत घामाच्या रूपानें शरीरांतील क्षार कमी होत असल्यानें नेहमींपेक्षा अधिक मीठ खाण्याची पद्धत हिंदच्या लष्करांत प्रचलित होती. पण आतां लष्कराच्या संशोधन संघटनेनें केलेल्या संशोधनावरून अधिक मीठ खाण्यानें रक्ताचा दाब वाढून शरीराला अपाय होण्याचा संभव असतो, असें आढळून आलें आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.